महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
४१२ ई शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.

जा.क्र. तंशिविकापु/आस्था ३ अ/२०२१/2258 दिनांक 20 MAY 2021

प्रति,

प्राचार्य/संचालक/उपसचिव,
सर्व शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये,
शासकीय तंत्र निकेतने व तत्सम संस्था,
पुणे विभाग पुणे.

विषय :- तात्पुरती जेष्ठतासूची बाबत.

संदर्भ :- या कार्यालयाचे पत्र क्र.तंशिविकापु/आस्था३अ/अं.जे.सू/२०२१/१९७७ दिनांक २३/०४/२०२१ व क्रमांक. २०९८ दिनांक ०५/०५/२०२१

उपरोक्त विषयाबाबत संदर्भिय पत्रानुसार या कार्यालयाने दिनांक ०१/०१/२०२१ ची तात्पुरती जेष्ठतासूची प्रसिध्द केलेली असून ती या कार्यालयाच्या संकेतस्थळावर सुध्दा आहे. याबाबत सर्व संस्थाप्रमुखांना असे कळविले आहे की, प्रसिध्द केलेली जेष्ठतासूची संस्थेतील सर्व संबंधीत कर्मचारी यांच्या निर्देशनास आणून त्यांची नोंद घेतल्याची सही घेवून या कार्यालयास सादर करावी.

परंतु अद्याप कोणत्याही संस्थेकडून संबंधीत कर्मचारी यांनी जेष्ठतासूची निर्देशनास आणून त्यांची नोंद घेतल्याची सहीची पोंच या कार्यालयास प्राप्त झालेली नाही.

तरी सर्व संस्थाप्रमुख/कार्यालय प्रमख यांना पुन्हा कळविण्यात येते की, संदर्भिय जेष्ठतासूची संबंधीत कर्मचारी यांना निर्देशनास आणून देवून त्यांची सहीची पोंच घेवून या कार्यालयास दिनांक ३१ मे २०२१ पर्यंत सादर करावी. तसेच सदर जेष्ठतासूचीत काही बदल असल्यास ते सुध्दा दिनांक ३१ मे २०२१ पर्यंतच संबंधीत कर्मचारी यांचे कडून लेखी घेवून ते या कार्यालयास सादर करावेत. तदनंतर कोणतीही बाब विचारात घेतली जाणार नाही व जेष्ठतासूची अंतिम प्रसिध्द करणेबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

(डॉ.द.व्यं.जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे.

प्रत - प्रोग्रामॅर, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेसाठी व सर्व संस्था/कार्यालय यांना ईमेलव्दारे पाठविणेसाठी.

C:\Users\ropune\Desktop\bhilave.docx